## सरकी व ढेप चोरी करणारे गुन्हेगार पोलीस स्टेशन आर्वी येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात आरोपीकडून एकूण ७१,८००/- रु चा माल जप्त.

फिर्यादी नामे मोहनलाल मालुराम अग्रवाल, रा. आर्वी यांची बि.एन. जिनींग अँन्ड प्रेसींग या नावाने स्टेशन वार्ड, आर्वी येथे कंपनी असुन त्या कंपनीमध्ये सरकी व ढेपीचे गोडाऊन आहे. फिर्यादी यांनी दि. २३.०५.२०२१ रोजी गोडाऊन मधील उपलब्ध साठ्याची पाहणी केली असता संपुर्ण साठा त्यांचे गोडाऊन मध्ये उपलब्ध होता. दि.०७.०६.२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादीचे कामावर असलेला फिटर नामे गोपाल दरोई याने फिर्यादी यांना सांगीतले की, त्यांचे गोडाऊन मधील उपलब्ध साठ्यापैकी २८ पोते ढेप, २ पोते सरकी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी दि.०६.०६.२०२१ ते दि. ०७.०६.२०२१ चे मध्यरात्री गोडाऊन वरील भिंतीला लागुन असलेल्या लोखंडी जाळी काढुन चोरुन नेला आहे. फिर्यादी यांनी स्वत: पाहणी करुन वर नमुद मुद्देमाल चोरी गेल्याचे आढळुन आल्याने फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन आर्वी येथे रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन आर्वी येथे अप.क्र. ४४७/२०२१ कलम ४६१,३८० भा.दं.वि. चा गुन्हा नोंद करुन करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान मुखबीर कडुन प्राप्त माहितीवरुन आरोपी क्र. १) राहुल सोहन राऊत, वय २५ वर्ष, २) पवण प्रभाकर थुल, वय २५ वर्ष दोन्ही रा. हमालपुरा, स्टेशन वार्ड, आर्वी, ३) सागर अनिल झोडे, वय २० वर्ष, रा. बाभुळगाव यांना ताब्यात घेवुन गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना गुन्ह्यात अटक करुन आरोपी क्र. २ यांचे ताब्यातुन १) २८ पोते ढेप प्रती पोते ४५ किलो प्रमाणे एकुण १३५० किलो किंमत ३७,८०० रु., २) २ पोते सरकी प्रती पोते ४५ किलो प्रमाणे एकुण ९० किलो किंमत ४००० रु., ३) एक हिरो कंपनीची काळया रंगाची पॅशन प्रो. मोटर सायकल क्र. एम.एच.-३२/ए.बि.-६५९१ कि. ३०,००० रु. असा एकुण जु.कि. ७१,८०० रु. चा माल जप्त करुन गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक, श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधीकारी, आर्वी श्री. सुनिल सोळुंके यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री. संजय गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार भगवान बावणे, भुषन निघोट, चंद्रशेखर वाढवे, राजु राऊत, मनोज भोमले यांनी केली.